# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिकेत कार्यरत ऐवजदार सफाई कामगार **{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** यांना नगर विकास विभागाचे शासन निर्णय दि. २०/०९/२०१९ नुसार अटी व शर्तीच्या अधिन राहुन अधिसंख्य सफाई कामगार या पदावर सामावुन घेण्यात आलेले आहे. या शासन निर्णयातील मुख्य अटीनुसार ऐवजदार कर्मचाऱ्यांना नियमीत करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली अधिसंख्य पदे त्यांचा सेवानिवृत्ती उपरांत आपोआप व्यपगत होत असल्याने, त्यांच्या वारसदारांना नियुक्ती देण्यासाठी कोणतेही अधिसंख्य पद निर्माण करण्यात येणार नाही अथवा व्यपगत झालेले पद पुनर्जिवीत करता येणार नाही या सह लाड पागे समितीच्या शिफारसी उपरोक्त अटीसह अधिसंख्य पदावरील कर्मचाऱ्यांना लागु राहतील असा स्पष्ट उल्लेख या शासन निर्णयामध्ये आहे.

नगर विकास विभागाचे दि. १०/०५/२०२३ चे शासन निर्णयानुसार नागपूर महानगरपालिकेचा आकृतीबंध मंजुर करण्यात आलेला असुन या मध्ये सफाई कामगारांची मंजुर करण्यात आलेली ८५६० पदामध्ये शासन निर्णय दि. २०/०९/२०१९ नुसार मंजुर ४४०७ अधिसंख्य सफाई कामगारांच्या पदांचा समावेश आहे. या ४४०७ अधिसंख्य पदापैंकी काही पदे रिक्त झाल्यास सदर पदे व्यपगत न होता या आकृतीबंधाचा भाग म्हणुन मंजुर करण्यात येत असल्याने कायम राहतील असा उल्लेख आहे.

करीता खालीलप्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करण्याचे प्रस्तावीत आहे.

१) नगर विकास विभागाचे शासन निर्णय दि. २०/०९/२०१९ अन्वये अधिसंख्य सफाई कामगारांच्या पदावर सामावुन घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना नगर विकास विभागाचे शासन निर्णय दि. १०/०५/२०२३ अन्वये आकृतीबंध अंतर्गत सामावुन घेण्यात आलेल्या ४४०७ कर्मचारी दि. १०/०५/२०२३ नंतर सेवानिवृत्त किंवा मयत होणाऱ्या कर्मचाऱ्यांची पदे व्यपगत होत नसल्याने व त्यांना शासन निर्णय दि. २०/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार लाड पागे समितीच्या शिफारसी लागु असल्याने सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना लाड पागे समितीच्या शिफारसी संदर्भातील वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचे निर्देशानुसार नियुक्ती देण्यास पात्र असतील अशा वारसदारांना लाड पागे समितीच्या शिफारसीनुसार नियुक्ती देण्यास मान्यता मिळण्याकरीता शासनाला प्रस्ताव सादर करणे आहे. शासनाने या प्रस्तावास मान्यता दिल्यास दि. ११/०५/२०२३ पासुन ते शासन मान्यता दिनांक या कालावधीत सेवानिवृत्त व मयत झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसांना अर्ज करण्यासाठी शासन मान्यतेच्या दिनांकापासुन पुढील १ वर्षाची मुदत देण्यास मान्यता देण्यात यावी.

२) शासन निर्णय दि. १०/०५/२०२३ रोजी मंजुर करण्यात आलेल्या आकृतीबंध अंतर्गत अधिसंख्य सफाई कामगार म्हणुन निर्माण करण्यात आलेले सर्व ४४०७ पदे सफाई कर्मचारी म्हणुन नियमीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे दि. २०/०९/२०१९ ते दि. १०/०५/२०२३ या कालावधीतील सेवानिवृत्त किंवा मयत अधिसंख्य सफाई कर्मचाऱ्यांची पदे देखील आकृतीबंध मंजुरीच्या शासन निर्णयात नियमीत केलेली आहेत. सदर पदे व्यपगत झालेली नाही. त्यामुळे दि.

२०/०९/२०१९ ते दि. १०/०५/२०२३ या कालावधीत मयत व सेवानिवृत्त झालेल्या अधिसंख्य पदावरील सफाई कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसदारांना शासन निर्णय दि. २०/०९/२०१९ च्या तरतुदीनुसार सफाई कर्मचारी नियुक्तीसाठी शासनाची मान्यता मिळावी. शासनाने या प्रस्तावास मान्यता दिल्यास दि. २०/०९/२०१९ ते दि. १०/०५/२०२३ या कालावधीत मयत किंवा सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या पात्र वारसास अर्ज करण्यासाठी शासन मान्यतेच्या दिनांकापासुन पुढील १ वर्षाची मुदत देण्यास मान्यता देण्यात यावी.

उपरोक्त संबंधाने विभागातर्फे सादर प्रस्तावास शासना तर्फे मान्यता प्राप्त झाल्यास मयत व सेवानिवृत्त कर्मचारी यांना देय लाभा व्यतिरीक्त अतिरीक्त आर्थिक बोजा म.न.पा. वर पडणार नाही. सध्यास्थितीत सदर कर्मचारी हे महानगरपालिकेत कार्यरत असुन त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर सफाई कर्मचाऱ्यांची रिक्त होणारी पदे भरली न गेल्यास महानगरपालिकेच्या कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

करीता शासन निर्णय दि. २०/०९/२०१९ नुसार अधिसंख्य सफाई कामगाराच्या पदावर समावुन घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन निर्णय दि. २४/०२/२०२३ नुसार लाड समितीच्या शिफारसीच्या अनुषंगाने वारसा हक्काचा लाभ देण्याकरीता शासनास प्रस्ताव सादर करण्याचे मान्यतेस सादर.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :-** 102 **/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 10/10/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेत कार्यरत ऐवजदार सफाई कामगार यांना नगर विकास विभागाचे शासन निर्णय दि. २०/०९/२०१९ नुसार अटी व शर्तीच्या अधिन राहुन अधिसंख्य सफाई कामगार या पदावर सामावुन घेण्यात आलेले आहे. या शासन निर्णयातील मुख्य अटीनुसार ऐवजदार कर्मचाऱ्यांना नियमीत करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली अधिसंख्य पदे त्यांचा सेवानिवृत्ती उपरांत आपोआप व्यपगत होत असल्याने, त्यांच्या वारसदारांना नियुक्ती देण्यासाठी कोणतेही अधिसंख्य पद निर्माण करण्यात येणार नाही अथवा व्यपगत झालेले पद पुनर्जिवीत करता येणार नाही या सह लाड पागे समितीच्या शिफारसी उपरोक्त अटीसह अधिसंख्य पदावरील कर्मचाऱ्यांना लागु राहतील असा स्पष्ट उल्लेख या शासन निर्णयामध्ये आहे.

नगर विकास विभागाचे दि. १०/०५/२०२३ चे शासन निर्णयानुसार नागपूर महानगरपालिकेचा आकृतीबंध मंजुर करण्यात आलेला असुन या मध्ये सफाई कामगारांची मंजुर करण्यात आलेली ८५६० पदामध्ये शासन निर्णय दि. २०/०९/२०१९ नुसार मंजुर ४४०७ अधिसंख्य सफाई कामगारांच्या पदांचा समावेश आहे. या ४४०७ अधिसंख्य पदापैकी काही पदे रिक्त झाल्यास सदर पदे व्यपगत न होता या आकृतीबंधाचा भाग म्हणुन मंजुर करण्यात येत असल्याने कायम राहतील असा उल्लेख आहे.

करीता खालीलप्रमाणे प्रस्ताव शासनास सादर करण्याचे प्रस्तावीत आहे.

१) नगर विकास विभागाचे शासन निर्णय दि. २०/०९/२०१९ अन्वये अधिसंख्य सफाई कामगारांच्या पदावर सामावुन घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना नगर विकास विभागाचे शासन निर्णय दि. १०/०५/२०२३ अन्वये आकृतीबंध अंतर्गत सामावुन घेण्यात आलेल्या ४४०७ कर्मचारी दि. १०/०५/२०२३ नंतर सेवानिवृत्त किंवा मयत होणाऱ्या कर्मचाऱ्यांची पदे व्यपगत होत नसल्याने व त्यांना शासन निर्णय दि. २०/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार लाड पागे समितीच्या शिफारसी लागु असल्याने सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना लाड पागे समितीच्या शिफारसी संदर्भातील वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचे निर्देशानुसार नियुक्ती देण्यास पात्र असतील अशा वारसदारांना लाड पागे समितीच्या शिफारसीनुसार नियुक्ती देण्यास मान्यता मिळण्याकरीता शासनाला प्रस्ताव सादर करणे आहे. शासनाने या प्रस्तावास मान्यता दिल्यास दि. ११/०५/२०२३ पासुन ते शासन मान्यता दिनांक या कालावधीत सेवानिवृत्त व मयत झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसांना अर्ज करण्यासाठी शासन मान्यतेच्या दिनांकापासुन पुढील १ वर्षाची मुदत देण्यास मान्यता देण्यात यावी.

२) शासन निर्णय दि. १०/०५/२०२३ रोजी मंजुर करण्यात आलेल्या आकृतीबंध अंतर्गत अधिसंख्य सफाई कामगार म्हणुन निर्माण करण्यात आलेले सर्व ४४०७ पदे सफाई कर्मचारी म्हणुन नियमीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे दि. २०/०९/२०१९ ते दि. १०/०५/२०२३ या कालावधीतील सेवानिवृत्त किंवा मयत अधिसंख्य सफाई कर्मचाऱ्यांची पदे देखील आकृतीबंध मंजुरीच्या शासन निर्णयात नियमीत केलेली आहेत. सदर पदे व्यपगत झालेली नाही. त्यामुळे दि. २०/०९/२०१९ ते दि. १०/०५/२०२३ या कालावधीत मयत व सेवानिवृत्त झालेल्या अधिसंख्य पदावरील सफाई कर्मचाऱ्यांच्या पात्र वारसदारांना शासन निर्णय दि. २०/०९/२०१९ च्या तरतुदीनुसार सफाई कर्मचारी नियुक्तीसाठी शासनाची मान्यता मिळावी. शासनाने या प्रस्तावास मान्यता दिल्यास दि. २०/०९/२०१९ ते दि. १०/०५/२०२३ या कालावधीत मयत किंवा सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या पात्र वारसास अर्ज करण्यासाठी शासन मान्यतेच्या दिनांकापासुन पुढील १ वर्षाची मुदत देण्यास मान्यता देण्यात यावी.

उपरोक्त संबंधाने विभागातर्फे सादर प्रस्तावास शासना तर्फे मान्यता प्राप्त झाल्यास मयत व सेवानिवृत्त कर्मचारी यांना देय लाभा व्यतिरीक्त अतिरीक्त आर्थिक बोजा म.न.पा. वर पडणार नाही. सध्यास्थितीत सदर कर्मचारी हे महानगरपालिकेत कार्यरत असुन त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर सफाई कर्मचाऱ्यांची रिक्त होणारी पदे भरली न गेल्यास महानगरपालिकेच्या कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

करीता शासन निर्णय दि. २०/०९/२०१९ नुसार अधिसंख्य सफाई कामगाराच्या पदावर समावुन घेण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन निर्णय दि. २४/०२/२०२३ नुसार लाड समितीच्या शिफारसीच्या अनुषंगाने वारसा हक्काचा लाभ देण्याकरीता शासनास प्रस्ताव सादर करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.